ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २३ जुलै, १९५२ | अंक ३०

## विविध माहिती

**कामगारांनीं आपली सोय करून घेतली**— टाटा वर्क्स युनिअन ह्या संघानें संघांतील आजारी कामगारांना थोडीबहुत मदत देण्याची योजना गेल्या जूनपासून अंमलांत आणली आहे. जे कामगार तीन वर्षें संघाचे सभासद असतील, त्यांना योजनेचा फायदा मिळणार आहे. सरकारची आरोग्य विम्याची योजना जमशेटपूरला १९५४ पर्यंत लागू होण्याची शक्यता नाहीं.

**जपानमध्यें बौद्धांची परिषद्**— येत्या सप्टेंबर महिन्यांत जपानमध्यें बौद्धधर्मीयांची एक जागतिक परिषद् भरणार आहे. आतांपर्यंत २० देशांनीं आमंत्रणें स्वीकारलीं आहेत. गौतमबुद्धाच्या धर्माची शिकवण जपानमध्यें आल्याला १,४०० वर्षें झालीं. तन्निमित्त ही परिषद् भरविण्यांत येत आहे.

**जपानला हत्तीची भेट**— अ. भा. विद्यार्थी फेडरेशनतर्फे जपानी लोकांना एक हत्ती भेट म्हणून पाठविण्याचें घाटत आहे. जपानमध्यें सध्या शिकत असलेल्या एका विद्यार्थ्यानें संस्थेतर्फे ह्यासंबंधीं जपानच्या शिक्षण-मंत्र्याकडे बोलणीं चालू केलीं आहेत.

**ऑस्ट्रेलिआ जपानी यंत्रें घेणार**— ऑस्ट्रेलिआंतील रोल्स राइस ही कंपनी जपानकडून यांत्रिक हत्यारें विकत घेण्यासंबंधीं बोलणीं करीत आहे. ह्या हत्यारांचा उपयोग करून जेटनें चालणाऱ्या विमानांचीं एंजिनें बनविण्याचा कंपनीचा इरादा आहे. सौद्यासाठी ब्रिटिश अर्थखात्याची मंजुरी घ्यावी लागेल.

**घड्याळजींचा भाव वाढला**—स्वित्झरलंडमधील घड्याळांच्या कारखान्यांतून कुशल कामगारांची वाण अलीकडे भासूं लागली आहे. तरूण कामगारांना घड्याळांचें किचकट काम करण्यापेक्षां विमानांचीं एंजिनें अगर बिनतारींचे सेट्स बनविणें अधिक पसंत पडूं लागलें आहे. एक चांगल्या प्रतीचें घड्याळ बनविण्यास १,४०० निरनिराळ्या कृति कराव्या लागतात.

**सीलोनचें तुटीचें अंदाजपत्रक**—सीलोनच्या १९५२-५३ च्या अंदाजपत्रकांत ३५० लाख रुपयांची तूट आली आहे. ह्या आर्थिक वर्षांत सीलोनच्या सरकारनें नवीन कर बसविलेले नाहींत सीलोनजवळ सोनें आणि डॉलर्स आदीकरून परकीय हुंडणावळ भरपूर प्रमाणांत आहे, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**नोकरांसाठी वेगळी सोय नाहीं**—वरिष्ठ वर्गानें प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या नोकरासाठी स्वतंत्र जागा राखुन ठेवण्याची सोय भारतीय रेल्वेजवर बंद करण्यांत येणार आहे असें समजतें. स्वित्झरलंडकडून मागविण्यांत आलेले नवे डबे जसजसे गाड्यांना जोडण्यांत येतील तसतशी ही सोय कमी करण्यांत येईल.

**खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी**—समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी कसें बनविण्यांत येऊं शकेल, ह्याचा अभ्यास करण्यासाठी खर्चाची तरतूद करणाऱ्या बिलावर प्रे. ट्रुमन ह्यांनीं सही केली. ह्या संशोधनासाठी २० लाख डॉलर्स खर्च येणार आहे.

**द. आफ्रिकेला डॉलर्सचें कर्ज**—द. आफ्रिकेच्या इलेक्ट्रिसिटी बोर्डाला १,९५,००,००० डॉलर्सचें कर्ज देण्याला इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेनें मंजुरी दिली आहे, असें समजतें. सोन्याची माती गाळून उरलेल्या गाळांतून युरेनिअम निघूं शकतें. पण त्यासाठी विजेचा पुरवठा लागतो. पुरवठा वाढविण्यासाठी जरूर असलेलीं विजेचीं यंत्रें वरील कर्जांतून विकत घेण्यांत येणार आहेत.

**साखरेचें वांटप**—ज्या साखरेच्या व्यापाऱ्यांनीं जून अखेर संपलेल्या तिमाहीचें आपलें साखरेचें वांटप नेलें नसेल त्यांना नवीन वांटपांत वांटा देण्यांत येऊं नये अशी विनंती संयुक्त-प्रदेश सरकारनें भारतीय सरकारला केली आहे. खुल्या बाजारांत साखर मिळूं लागल्यापासून घाऊक व्यापारी आपली साखर घेण्यास नाखूष दिसत आहेत.

**पनवेल नगरपालिकेचा मच्छिबाजार**—पनवेल नगरपालिकेनें १०-१२ हजार रुपये खर्चून आधुनिक पद्धतीचा एक मच्छिबाजार बांधला आहे. अशा तऱ्हेचें हें मार्केट कुलाबा जिल्ह्यांत पहिलेंच आहे असें समजतें. ओला व सुका माल मिळण्याची स्वतंत्र सोय करण्यांत आली आहे.

**उत्तर-प्रदेशांतील विद्यार्थी**—उत्तर-प्रदेश राज्यांत सध्या ३२ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १९४५-४६ सालांतील विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षां विद्यार्थ्यांची ही संख्या सुमारें १२ लाखांनीं अधिक आहे असें समजतें.

**मोनोझाइटचा कारखाना**—मोनोझाइट वाळू शुद्ध करण्याचा एक कारखाना हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रणाखालीं त्रिवेंद्रम् येथें काढण्यांत येत आहे. ह्या कंपनीच्या भांडवलापैकीं ५५ टक्के भाग भारत-सरकारचे असून उरलेले त्रावणकोर-कोचीन राज्य-सरकारच्या मालकीचे आहेत.

**तांदुळाच्या उत्पादन-वाढीचें शिक्षण**—कोईमतूर येथील शेतकी कॉलेजांत तांदुळाच्या उत्पादनाच्या वाढीचा अभ्यास करण्यासाठी एक अभ्यासक्रम ठेवण्यांत आला आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न आणि शेतकी संघटनेमार्फत तो चालविण्यांत येणार असून हिंदी व परदेशी शेतकी शिक्षणतज्ज्ञ शिक्षण देणार आहेत.

## जपान भारतीय कोळसा अधिक प्रमाणांत घेणार

जपानच्या सरकारनें आपली डॉलर्सची गंगाजळी जपून ठेवण्याचें आणि पौंडी गटांतील देशांकडून अधिक प्रमाणांत आयात करण्याचें धोरण आखलें आहे. सरकारच्या व्यापार आणि उद्योगखात्यानें ह्यासंबंधीं एक योजना आखली असून तीव्रहुकूम पुढील महिन्यापासून जपान भारताकडून अधिक कोळसा घेऊं लागेल आणि आपल्याला लागणारा कापूस पौंडी गटांतील देशांकडून आयात करूं लागेल. जपानच्या आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांवर असें बंधन घालण्यांत येणार आहे कीं वरील दोन जिनसा त्यांनीं प्रथम पौंडी गटांतील देशांकडून आयात केल्यावर मगच त्या डॉलर्सच्या कक्षेंतील देशांकडून आयात करण्यास त्यांना परवानगी देण्यांत येईल. चालू वर्षाच्या एप्रिल तें सप्टेंबर पर्यंतच्या काळांत भारताकडून ४,००,००० टन आणि अमेरिकेकडून ८,००,००० टन कोळसा जपानला घ्यावयाचा आहे. त्यापैकीं जून अखेर अनुक्रमें १,००,००० टन व २,००,००० टन कोळसा जपाननें खरेदी केला आहे. मूळ असें ठरलें होतें कीं जुलै नंतर भारताकडून ३,००,००० टन आणि अमेरिकेकडून ६,००,००० टन कोळसा घ्यावा. परंतु आतां ठरलेल्या नव्या योजनेप्रमाणें भारताकडून, ६,००,००० टन आणि अमेरिकेकडून ३,००,००० टन कोळसा जपान घेईल. अमेरिकेकडून आयात करावयाच्या कोळशाच्या प्रमाणांत कपात केल्यामुळें जपानजवळील डॉलर्सची हुंडणावळ अधिक काळ पुरेल, असा अंदाज करण्यांत येत आहे.

---

## ब्रिटनमधील सिनेमा–गृहांचें उत्पन्न

ब्रिटनमधील सिनेमा–गृहांतून दाखविल्या जाणाऱ्या बोलपटांना आतां कमी गर्दी होऊं लागली आहे. १९५० सालापेक्षां १९५१ सालीं एकूण ३,००,००,००० कमी प्रेक्षकांनीं बोलपट पाहिले. असें असलें तरी तिकिटविक्रीच्या गल्ल्यांत ३ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून आलें. १९५० सालीं एकूण १,३९,५८,२८,००० प्रेक्षकांनीं सिनेमा पाहिला. १९५१ सालीं ही संख्या २·२ टक्क्यांनीं घटून ती १,३६,५०,३६,००० इतकी झाली. गल्ल्यांत जमा झालेली वट्ट रक्कम १९५० सालीं १०,८२,९६,००० पौंड होती, तर १९५१ सालीं ती १०,२९,६८,००० पौंड भरली. प्रत्येक प्रेक्षकामागें १९५० सालीं तिकिटाच्या दराची सरासरी १८·१ पेन्स होती ती १९५१ सालीं १९ पेन्स झाली. सरासरींत पडलेल्या ह्या फरकामुळेंच सिनेमा पहाणाऱ्या प्रेक्षकांच्या संख्येंत घट होऊन सुद्धां तिकिटऑफिसमध्यें जमलेल्या वट्ट गल्ल्यांत वाढ झालेली दिसून येते. ह्या वट्ट उत्पन्नांतून करमणुकीवरील कर आणि ब्रिटिश फिल्म प्रॉडक्शन फंडाला देण्यांत येणारी वर्गणी वजा घालतां १९५१ सालचा निव्वळ उत्पन्नाचा आंकडा ६,८९,२५,००० पौंड असा आहे. करमणुकीवरील कर आणि फंडाची वर्गणी मिळून ३९,३,००,००० पौंड सिनेमागृहांना द्यावे लागले. हे सर्व आंकडे ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें प्रसिद्ध केलेले आहेत.

---

## हेलसिंकी येथें नफेबाजीस आळा

हेलसिंकी येथील ऑलिंपिक सामन्यांसाठी परराष्ट्रांतील खेळाडू व प्रेक्षक गेले, त्यांचें नफेबाजांपासून संरक्षण व्हावें, ह्यासाठी फिनिश सरकारनें खाजगी पोशाखांतील खास पोलिस इन्स्पेक्टरांची योजना केली आहे. कोणासहि भारी किंमतीबाबत शंका आली, तर त्यानें ताबडतोब सूचना द्यावी, गुन्हेगारांस कडक शासन केलें जाईल, असें सरकारनें जाहीर केलें आहे.


दि
युनायटेड कमर्शिअल
बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.



दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.





# अर्थ

बुधवार, ता. २३ जुलै, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जपानी स्पर्धेचें स्वरूप

जपानी कारखानदारांची स्पर्धा इतर देशांना आतां जाणवूं लागली आहे, आणि सर्व तऱ्हेचा जपानी माल परदेशी बाजारपेठा काबीज करूं लागला आहे. जपानी कापड किंवा खेळणीं एवढ्यापुरतीच ती स्पर्धा मर्यादित नाहीं, आणि केवळ किंमतीनें स्वस्त म्हणून जपानी मालाचा खप वाढत आहे असेंहि नाहीं. उच्च दर्जाची व्यापारी नीतिमत्ता, मालाचा तात्काळ पुरवठा, विकण्याची आकर्षक हातोटी, नमुन्याप्रमाणें व सांगितल्याप्रमाणें हुबेहूब बनावट, इत्यादि गुणांचे बाबतींत जपान ग्रेट ब्रिटनवरहि मात करूं लागला आहे. युद्धसमाप्तीनंतरच्या ब्रिटिश मालाचा दर्जा पूर्ववत उरलेला नाहीं अशी तक्रार ऐकूं येते, तर जपानी मालाच्या बाबतींत उलट परिस्थिति दिसते. भारत मात्र अद्याप कोठेंच नाहीं आणि भारतीय गिऱ्हाईक ब्रिटिशांच्या हातचें सुटून जपान्यांच्या हातीं जात आहे, एवढाच फरक आहे.

इंग्रज–जपानी स्पर्धा भारतांत मोठ्या प्रमाणावर होऊं लागली असून त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देणें इंग्रजांना आवश्यक झालें आहे. एकॉनॉमिस्ट पत्रानें ह्यासंबंधांत दिलेला तपशील उद्बोधक आहे. नुकतीच उत्तर भारतांतील एका स्क्रूच्या कारखान्यास जपाननें बारा यंत्रें २,०२४ पौंडांस मुंबई–पोंच दिलीं. तशींच यंत्रें ब्रिटिश कारखानदार कारखान्याच्या दाराशींहि ९,४५६ पौंडांस देऊं शकला नसता ! कित्येक उपटसुंभ नव्या दुकानदारांच्या गैरशिस्त वागणुकीमुळेंहि ब्रिटिश मालाचा लौकिक जात चालला आहे. दिल्ली येथील एका व्यापाऱ्यानें २२० व्होल्टचे एसी. विजेचे पंखे मोठ्या प्रमाणावर मागवले, पण त्याच्या पदरीं ११० व्होल्टचे डीसी पंखे आले. त्यानें रागावून लिहिलेलें तक्रारीचें पत्र "सापडत नाहीं, निघून गेला" अशा शिक्क्यानिशीं त्याचेकडे परत आलें. नेमकें काय पाहिजे, हें यंत्रसामुग्री मागविणारांना माहीत असलें तरी त्यांना तें इंग्रजांकडून मिळणें कठीण जातें. मग, तें माहीत नसणारांच्या अडचणी विचारावयासच नकोत. जपानी लोक मात्र सर्व अडचणी लक्षांत घेऊन त्याप्रमाणें कारखान्याची आखणी करून यंत्रें उभारून देण्याच अंगावर घेतात. सहाजिकच, त्यांचा माल खपतो.

यंत्रसामुग्रीविषयीं चौकशी करणाऱ्या कांहीं हिंदी फर्म्स म्हणजे कधींकधीं एका खणाचे दुकानांत बसणारा एक लहानसा व्यापारी निघतो आणि त्याच्या मेहुण्याच्या वशिल्यानें टाईप रायटर मिळवून तो भकपेबाज नोटपेपरवर पत्रें पाठवीत असतो ! ह्याच्या उलट, मोठमोठ्या फर्म्सना नीट पत्रें पाठवितां येत नाहींत व त्यांच्या चौकशांकडे दुर्लक्ष केलें जातें. ब्रिटिश कारखानदार हिंदी फर्म्सवर कांहीं अटी घालतात, तशा जपानी कारखानदार घालीत नाहींत. हिंदी कारखानदारांचा तयार होणारा माल कितीहि स्वस्त, कोठेंहि विकला जाण्यास जपानी कारखानदार प्रतिबंध करीत नाहींत.

अमेरिकन सरकार जपानला डॉलर्सच्या स्वरूपांत मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहे, ती जपानी स्पर्धेच्या द्वारां ब्रिटनला भोवत आहे, अशी ब्रिटिश कारखानदारांची तक्रार आहे. पेटंट, कॉपीराइट, ट्रेड मार्क, इत्यादींचें उल्लंघन जपानी कारखानदार मोठ्या प्रमाणावर करीत असून त्यास आळा घालण्यासाठी ब्रिटिश फर्म्सची संघटना करणें जरूर आहे, असेंहि सुचविलें जात आहे. टोकियोचें सरकार आतां सार्वभौम झालें असलें, तरी जपानी कामगारांच्या हिताचे दृष्टीनें कायदे करण्यास त्याला जोंवर लावतां येईल, तोंवर त्या दिशेनेंहि प्रयत्न केले पाहिजेत, अशीहि एक सूचना आहे. जपानी स्पर्धेचें स्वरूप व त्याबाबत ब्रिटिश दृष्टिकोन वरील हकीकतीवरून स्पष्ट होईल.

## इं. फि. कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जें

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ३० जून, १९५२ अखेर संपलेल्या वर्षीं सुमारें ४ कोटी, ४५ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. ज्यांना कर्जें दिलीं, त्यांत एकूण १५ कोटी, ३ लक्ष रुपये अगोदरच गुंतलेले होते.

| उद्योगाचें स्वरूप | एकूण गुंतलेलें भांडवल रु. | १९५१–५२ मध्यें दिलेलें कर्ज रु. |
|---|---|---|
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | ९०,३६,००० | ३०,५०,००० |
| सिरॅमिक्स व ग्लास | १,३४,०९,००० | ३९,००,००० |
| मेटॅलर्जिकल कारखाने | ११,३६,००० | ५,००,००० |
| कागद व स्ट्रॉबोर्ड | १,४०,६२,००० | ७१,००,००० |
| कपास व कापड | १,४९,७६,००० | ४३,७५,००० |
| वीज | ९,८१,००० | ५,५०,००० |
| साखर | २,६९,५४,००० | ९५,००,००० |
| रसायनें | ४,६३,४५,००० | १,००,००,००० |
| कापड गिरण्यांचीं यंत्रें | २६,८२,००० | ६,००,००० |
| लोखंड–पोलाद | ४०,८३,००० | ८,००,००० |
| मेकॅनिकल इंजिनिअरिंग | १,१९,५९,००० | १९,००,००० |
| इतर | ४७,३६,००० | २२,००,००० |

## कापडाच्या गिरण्यांचा धंदा स्थिर पायावर कसा येईल ?

"कापडाचा धंदा अत्यंत कठीण अवस्थेंत आहे. किंमती उतरणें आणि बाजार खुले होणें ह्यामुळें होणारे फरक थोडे जाचक होणें स्वाभाविक आहे. जीं नियंत्रणें आतां आवश्यक नाहींत, तीं सरकारनें सत्वर काढून टाकावीं. गिऱ्हाइकाला जें हवें असेल तें पूर्वीपासून चालू असलेल्या रूढ मार्गानें, योग्य किंमतीस, त्याला विकता येण्याची गिरणी मालकास मोकळीक पाहिजे; म्हणज परिस्थिति आटोक्यांत लवकर येऊं शकेल. नाहीं तर, बाजारांतील सध्याचें अनिश्चितपणाचें वातावरण व गिरण्यांचें नुकसानींतील उत्पादन तसेंच कांहीं काळ चालू राहील. स्पर्धेची बाजारपेठ दीर्घ काळ लांबवून ठेवतां येणें अशक्य आहे. तेव्हां उत्पादन खर्च सर्व बाजूंनीं कमी करण्याचें आणि त्याच वेळीं मालाचा दर्जा कायम राखण्याचें महत्त्व, ह्याचा कितीहि वेळा पुनरुच्चार केला, तरी तो वावगा होणार नाहीं."— विष्णु कॉटन मिल लि. चे चेअरमन.

## भूदान–यज्ञाची प्रगति

आज या चळवळीचा पुष्कळसा भार आचार्य विनोबा भावे यांनीं उचलला आहे. त्यांनीं उत्तर प्रदेशांत आतापर्यंत (जून १९५२ अखेरपर्यंत) एकूण २,३९,६३५ एकर जमीन मिळवली आहे. ही जमीन शेत कसणाऱ्या भूहीन लोकांमध्यें वांटण्याचें कामहि याबरोबरच चालू झालें आहे. या कामीं आपलें सहकार्य देण्यांत राज्यसरकारेंहि मागें पडलेलीं नाहींत. भूदान–यज्ञांतून होत असलेला जमिनींच्या स्वामित्वाचा पालट सुरळीतपणें व्हावा म्हणून हैद्राबाद, विंध्यप्रदेश व उत्तर प्रदेश सरकारांनीं तत्परतेनें नियम बनविले आहेत. मध्यप्रदेश सरकारनें राज्यांतील अधिकारी-वर्गाला भूदान–यज्ञाच्या कार्यकर्त्यांना मदत करण्यासंबंधीं सूचना दिल्या आहेत.

देशांतल्या कानाकोपऱ्यांत हें कार्य सफल करण्याकरितां कोणत्या प्रांतानें किती एकर जमीन मिळविण्याचा निर्धार केला आहे व किती आतांपर्यंत मिळविली आहे, ही उद्बोधक माहिती खालीं दिली आहे:—

| प्रदेश | पुढील दोन वर्षांचा संकल्प एकर | दान मिळालेली जमीन एकर |
|---|---|---|
| आसाम | २५,००० | ...... |
| आंध्र | १,००,००० | ...... |
| उत्तर प्रदेश | ५,००,००० | २,४०,००० |
| ओरिसा | ५०,००० | २,००० |
| कर्नाटक | ...... | ...... |
| केरळ | ...... | ...... |
| गुजरात | ...... | २,५०० |
| तामिलनाड | १,००,००० | ...... |
| दिल्ली | १०,००० | १,००० |
| पंजाब, पेप्सु | १,००,००० | ...... |
| बिहार | ४,००,००० | ...... |
| बंगाल | १,००,००० | ...... |
| मुंबई | ...... | ...... |
| मध्य प्रदेश | १,००,००० | ७,३६३ |
| महाराष्ट्र | १,००,००० | ...... |
| मध्यभारत | १,००,००० | २,००० |
| म्हैसूर | ...... | ...... |
| राजस्थान | २,००,००० | १,००० |
| विंध्य प्रदेश | ४०,००० | २,००० |
| सौराष्ट्र | ...... | ...... |

### पुणें सें. को. बँकेची नारायणगांव शाखा

पुणें सें. को. बँकेची जुन्नर उपशाखा (पे ऑफिस) नारायणगांव येथें रविवार दिनांक २० जुलै १९५२ रोजीं दुपारीं २ वाजतां बँकेचे तेथील कचेरींत श्री. बी. डी. देशमुख, बी. ए., एलूएल्. बी. उपमंत्री, सहकार, मुंबईप्रांत यांचे हस्तें सुरू करण्यांत आली.

### भारतांत मध्यम वर्गावर अधिक प्राप्ती–कर

नवीन भांडवलाची घडण करण्यांत अगर सरकारी कर्जें उभारण्यांत अलीकडे मध्यमवर्गाला पूर्वीपेक्षां अधिक आवाहन करण्यांत येत असतें. कारण, बचत करण्याची प्रवृत्ति आणि थोडीफार शक्यता ह्याच वर्गांत दिसून येते असा समज आहे. ह्या वर्गावर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीत्या जे कर बसविण्यांत येतात त्यांच्यामुळें त्या वर्गाच्या बचत करण्याच्या प्रवृत्तीवर अर्थातच परिणाम होतो. म्हणून मध्यमवर्गावर करांचा बोजा कितपत पडतो, हा प्रश्न राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचा ठरतो.

दि असोसिएशन ऑफ इंडियन ट्रेड अँड इंडस्ट्री ह्या संस्थेनें मध्यमवर्गाकडून वसूल करण्यांत येणाऱ्या प्राप्तीवरील करांचा तौलनिक अभ्यास करणारा एक आढावा नुकताच प्रसिद्ध केला आहे. ह्या आढाव्यांत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील राष्ट्रें, अमेरिका, जपान, फ्रान्स, स्वीडन, इजिप्त आणि ब्राझिल इत्यादि देशांचा समावेश करण्यांत आला आहे. भारतांत निरनिराळ्या उत्पन्नांच्या गटावर ज्या दरानें प्राप्तीवरील कर आकारण्यांत येतो त्यांचाहि तौलनिक विचार करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, भारतांत २० हजार ते १,००,००० रुपये पर्यंतच्या उत्पन्नांच्या गटावर घेण्यांत येणाऱ्या प्राप्तीवरील करांचे दर इतर राष्ट्रांतील ह्याच गटांवर घेण्यांत येणाऱ्या दरांपेक्षां बरेच अधिक आहेत. त्याचप्रमाणें १,००,००० ते १०,००,००० पर्यंतच्या व्यक्तिशः उत्पन्नाच्या गटांवरहि इतर देशांच्या मानानें चढत्या दरानें कर वसूल करण्यांत येतो. भारतामधील मध्यमवर्गाला इतर देशांप्रमाणें कुटुंब–भत्ता, म्हातारपणाचा भत्ता अगर मोफत वैद्यकीय मदत मिळत नसल्यामुळें ह्या वर्गाकडून घेण्यांत येणाऱ्या प्राप्तीवरील कराचें प्रमाण इतर देशांतील मध्यम-वर्गाकडून घेण्यांत येणाऱ्या करांपेक्षां बरेंच अधिक पडतें असें मत आढाव्यांत व्यक्त करण्यांत आलें आहे. ह्यासंबंधीं देण्यांत आलेला तक्ता ह्या पृष्ठाच्या तळाशीं देण्यांत आला आहे.

**नागपूरच्या कॉलेजला मदत**—नागपूर येथील शेतकी कॉलेजला फोर्ड फौंडेशनकडून २ लाख रुपये मदत मिळणार आहे. प्रत्यक्ष शेतांत काम करण्याचें शिक्षण देण्यासाठीं १०० गांवांचें एक केंद्र वरील मदतीमधून कॉलेज चालविणार आहे. फोर्ड फौंडेशन पहिल्या वर्षीं ह्या केंद्रासाठीं होणाऱ्या खर्चापैकीं ५० टक्के खर्च सोसणार आहे.

**उत्तर–प्रदेशांतील भूदान–यज्ञ**—उत्तर-प्रदेशांतील बालिआ जिल्ह्यांतील १०० कुटुंबांना ३५० एकर जमीन श्री. विनोबाजी भावे ह्यांनीं चालविलेल्या भूदान–यज्ञांत देण्यांत आली. ह्या शेतकरी कुटुंबांना नांगर आणि बीं-बियाणेंहि पुरविण्यांत आलें. ह्या जिल्ह्यांत विनोबांना जी जमीन देण्यांत आली ती छोट्या शेतकऱ्यांकडून मिळालेली होती.

| देश व वर्ष | किमान करपात्र उत्पन्न | कराची टक्केवारी | कमाल करपात्र उत्पन्न | कराची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भारत १९५२–५३ | १,५०० ते ५,००० रुपये | ४·९ टक्के | १,५०,००० रुपयांच्या पुढें | ८२ टक्के |
| इंग्लंड १९५२–५३ | १,३३० रुपयांपर्यंत | १·५ टक्के | २,००,००० रुपयांच्या पुढें | ९७·५ टक्के |
| अमेरिका १९५२ | ९,५४० रुपयांपर्यंत | २०·४ टक्के | ९,५४,००० रुपयांच्या पुढें | ९१ टक्के |
| कॅनडा १९५०–५१ | ४५८० रुपयांपर्यंत | १५ टक्के | १८,३२,००० रुपयांच्या पुढें | ८० टक्के |
| ब्राझिल १९५१–५२ | ७७२ ते १५५४४ रुपयांपर्यंत | ३ टक्के | ७,७७,२०० रुपयांच्या पुढें | ५० टक्के |

## जगाच्या भूमीभागाची पहाणी

## व

## वाढत्या लोकसंख्येस अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न

**( लेखकः— प्रो. वा. कृ. कोगेकर )**

प्रोफेसर एल्. डड्ले स्टँप, सुप्रसिद्ध भूगोलशास्त्रज्ञ, यांनीं वरील विषयावर प्रगट केलेले विचार फारच महत्त्वाचे व विचार करण्यासारखे असल्यानें ते सारांश रूपांत खालीं दिले आहेत.

आज जगापुढें फार महत्त्वाचा प्रश्न उभा असलेला म्हणजे लोकसंख्येंत होणाऱ्या वाढीचा. जगाच्या लोकसंख्येचा आकडा नुकत्याच केलेल्या अंदाजावरून २३५ कोटी पर्यंत गेलेला आहे व जगदकुटुंबाची वाढ दरसाल २ कोटी संख्येनें होत आहे. म्हणजे, दररोज सुमारें ६० ते ७० हजार जन्मास येणाऱ्या माणसांकरितां अन्नाची तरतूद झाली पाहिजे. अन्नपदार्थांचें उत्पादन जरी थोडें-बहुत वाढत असलें तरी वरीलप्रमाणें वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणांत वाढलेलें नाहीं. शास्त्रीय ज्ञानाच्या सहाय्यानें पिकांचें एकरी उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न सारखे चालू आहेत. त्याचप्रमाणें, पिकावर पडणाऱ्या किडी व इतर रोग, पशुपक्षी यांजपासून पिकांस नुकसान पोंचूं नये म्हणूनही प्रयत्न चालू आहेत. शेतीच्या जनावरांचे रोगराईपासून बचाव होण्याकरितांही प्रयत्न चालू आहेत. तथापि अशा प्रकारचे सर्व प्रकारें शास्त्रीयरीत्या प्रयोग करूनहीं वाढत्या लोकसंख्येस अन्नपुरवठा होण्याची उत्पन्नांत बरोबरी झालेली नाहीं.

**जमीन व लोकसंख्याः—** जगांतील लोकसंख्या जगांतील सर्व जमिनीवर सारखी वाटली गेली तर प्रत्येक व्यक्तीच्या वाटणीस अदमासें १४ एकर जमीन येईल. परंतु जगांतील सर्वच जमीन पिकें येण्यासारखी नाहीं. कांहीं भाग असे आहेत कीं, तेथील अत्यंत गारठ्यामुळें पिकें होणेंच शक्य नाहीं. कांहीं भाग इतके उष्ण व कोरडे आहेत कीं तेथेंही कांहीं होणें शक्य नाहीं. पुष्कळसा भाग डोंगराळ व खडकाळ असल्यामुळें त्यावर पिकें होण्याइतपत मातीही नसते. ज्या थोड्या जमिनी पडीत आहेत त्या लागवडीखालीं आणतां आल्यास साधारणपणें प्रत्येक माणशीं जमिनीचें प्रमाण सुमारें ४ एकर पडेल. परंतु या चार एकरांमध्यें जंगलें व गवतांकरितां टाकलेल्या पडित जमिनींचाही समावेश होतो व या प्रदेशांत लोकवस्ती नाहीं हें लक्षांत ठेविले पाहिजे.

सध्यांच्या अत्यंत सुधारलेल्या पद्धतीनें शेती केल्यास सर्वसाधारणपणें एका एकरांत उत्पन्न झालेलें धान्य एका मनुष्यास वर्षभर पुरेल असा अंदाज आहे. उष्णकटिबंधांतील प्रदेशांत जेथें पाऊस मुबलक पडतो व भातासारखीं पिकें जोमांत येतात अशा ठिकाणीं एका एकरातील पीक एकापेक्षां जास्त इसमासही पुरूं शकेल. परंतु ज्या प्रदेशामध्यें वर्षातील बरेच दिवस थंडी असून जमिनीवर बर्फ पडून त्या दगडासारख्या कठीण बनतात त्या ठिकाणीं वरील प्रमाण लागू पडणार नाहीं. कारण अशा ठिकाणीं उत्पन्नाचें मान फारच कमी असतें.

जगांतील एकंदर जमिनीवर किती लोक जगूं शकतील हा प्रश्न सोडविणें फार कठीण आहे. कारण या बाबतींत पुरेसें ज्ञान अवाप्त झालेलें नाहीं. शिवाय, जगाच्या पुष्कळशा भूमीभागाचा उपयोग सध्यां कसा होत आहे याबद्दलही असावी तितकी माहिती उपलब्ध नाहीं. युरोपांतील देशांत व ज्या इतर देशांमध्यें शेतीखात्यांची योग्य रचनाबद्ध मांडणी झालेली आहे अशा देशांत [ उदाहरणार्थ, हिंदुस्थान (भारत), पाकिस्तान व सीलोन या देशांमध्यें ] निरनिराळ्या अन्नपिकाखालीं असलेल्या जमिनीची आकडेवार माहिती व त्याचप्रमाणें जमिनीचा उपयोग इतर कोणत्या कारणाकडे होत आहे यासंबंधानेंही माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यावरून जमिनीचा उपयोग उत्पादनाकडे होतो किंवा कसें हें समजणें शक्य झालें आहे. वरीलप्रमाणें सध्यां जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून बरीचशी जमीन "कल्टिव्हेबल वेस्ट" म्हणजे 'लागवडीस योग्य परंतु पडित' या सदराखालीं घातलेली दिसून येते. यावरून पुष्कळशी जमीन पिकांची लागवड करतां येण्यासारखी असून त्यांतून धान्यउत्पादन झालें पाहिजे परंतु सध्यां होत नाहीं. असें जर असेल तर या पडित जमिनी कोठें कोठें आहेत व या पिकांच्या लागवडीकरितां कां आणल्या जात नाहींत हे फार महत्त्वाचे प्रश्न आहेत व या प्रश्नांचीं उत्तरें "जागतिक जमीन–उपयोग पहाणी" देण्याचा प्रयत्न करीत आहे.

**जमीन–उपयोग पहाणी खातें—** हें जागतिक जमीन–उपयोग पहाणी खातें १९४९ च्या ईस्टरमध्यें पोर्तुगाल देशांतील लिस्बन शहरीं जेव्हां अंतरजागतिक शास्त्रज्ञांची परिषद भरली होती त्या वेळीं अस्तित्वांत आलें; व 'युनस्कोच्या' मदतीनें जगांतील प्रत्येक देशाच्या जमिनीचा उपयोग सध्यां कसा होत आहे याची सर्व्हे ( पहाणी ) करण्याच्या शक्यतेच्या बाबतींत विचारविनिमय करण्याकरितां एका कमिशनची घटना करण्यांत आली.

हें पहाणीचें काम फारच अजस्र स्वरूपाचें असल्यानें, जगांतील प्रत्येक देशानें स्वतः पुढें येऊन सहकार करून आपआपल्या परीं काम करण्यामध्यें भाग घेतला तरच हें शक्य होण्यासारखें आहे. कांहीं देशांनीं या कामामध्यें पुढाकार घेऊन हें सुरूं केलेलें आहे. त्यांचें उदाहरण अनुसरून निरनिराळे इतर देशही आपआपल्या प्रदेशामध्यें या कामाची रचना सुरू करतील अशी आशा आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थान देशानें हें प्रायोगिक किंवा प्राथमिक पहाणीचें काम लवकरच सुरू करण्याकरितां एक खंबीर अशी राष्ट्रीय कमिटी नेमलेली आहे. त्याचप्रमाणें कोलंबो विश्वविद्यालयानें या कामाकरितां लंका देशांत काम करण्याकरितां एक मंडळ स्थापन केलेलें आहे असें समजतें. सिंगापूर विश्वविद्यालयांत काम करणाऱ्या प्राध्यापकांनीं हें काम सुरू केलेलें आहे असेंही समजतें.

मुख्य महत्त्वाचें पहिलें काम म्हणजे सध्यां जमिनीच्या प्रत्येक तुकड्याचा कशा प्रकारें उपयोग होत आहे हें प्रत्यक्ष नकाशावर दाखविण्यांत येऊन असे नकाशे तयार करणें हें होय प्रो. डडले स्टँप म्हणतात कीं, आम्हीं म्हणजे नेमलेल्या कमिशननें, जमिनीच्या वर्गीकरणाची योजना आखलेली आहे व त्यावरून जगांतील बहुतेक सर्व जमिनी थोड्याफार फरकानें या वर्गीकरणाखालीं बसूं शकतील. या वर्गीकरणाप्रमाणें जमिनीचे नऊ वर्ग कल्पिलेले आहेत. ते खालीलप्रमाणें आहेत.

**जमिनीचें वर्गीकरण—** पहिला वर्ग, शहरें व खेडीं गावें वसलेलीं व त्यांशीं संबद्ध असलेली–जिचा उपयोग खाद्यपदार्थ उत्पन्न करण्याकडे होत नाहीं अशी—वसाहतीखालील जमीन. दुसरा वर्ग म्हणजे ज्या जमिनीवर बागायत व भाजीपाले वगैरे सारखीं खाद्य पिकें केलीं जांतात त्या. तिसऱ्या वर्गामध्यें ज्या जमिनीवर झाडें लावून त्यापासून खाद्य पदार्थ मिळतात अशा. यामध्यें पुष्कळ

प्रकार आहेत. युरोपमध्यें सफरचंद व इतर प्रकारचीं फळझाडें लावून त्या फळांचा खाण्याकडे उपयोग होतो. परंतु उष्णकटिबंधा मधील झाडांपासून खाद्य पदार्थ न मिळतां कच्चा माल मिळतो, ( रबराच्या झाडापासून रबर वगैरे. ) चवथ्या वर्गामध्यें निरनिराळ्या प्रकारच्या पिकांखालीं केलेली जमीन येते. यामध्यें कांहीं जमिनींवर एका मागून एक अशीं सारखीं पिकें घेतलीं जातात व कांहींवर पिकें घेऊन त्या पडित टाकल्या जातात. हा फरक प्रामुख्यानें लक्षांत ठेवला पाहिजे. पांचव्या वर्गामध्यें गवताखालीं असलेल्या व जनावरास चरण्याकरितां मुद्दाम राखून ठेवलेल्या जमिनी येतात. यापासूनच गवत व चारा जनावरांस मिळतो. सहाव्या वर्गामध्यें पडित चराऊ रानें येतात व हा वर्ग पांचव्या पासून भिन्न समजण्यांत येतो. सातव्या वर्गात जंगलें व निरनिराळ्या प्रकारच्या झाडींचे प्रदेश येतात. आठव्या वर्गामध्यें पाणथळ व दलदलींचा भूमीभाग येतो, व शेवटच्या म्हणजे नवव्या वर्गामध्यें अजिबात न पिकाऊं जमीन येते.

वरील प्रकारचें पहाणीचें काम हें विश्वविद्यालयीन विद्यार्थी व पदवीधर, ज्यांना अशा प्रकारच्या कामीं वेळ देतां येऊन काळजीपूर्वक व बरोबर निरीक्षण करतां येईल अशांनीं केलें पाहिजे. यांना नकाशासंबंधीं बरोबर माहिती असून त्यांचा उपयोग करतां आला पाहिजे. याकरितां साधे नेहमींचे नकाशे घेऊन शेतांत जाऊन त्या नकाशावर प्रत्येक जमिनीच्या तुकड्याची माहिती त्यावर लिहावयाची. अशा नकाशांच्या नंतर स्वच्छ प्रती तयार करावयाच्या व त्यांत निरनिराळे रंग भरावयाचे व यावरून आपणास सब भूमीभागाचा एक प्रकारें फोटोग्राफच तयार झालेला मिळेल.

ठिकठिकाणीं मिळणाऱ्या नकाशाचें स्केल वेगवेगळें असणार. जगामध्यें असे कांहीं भाग आहेत कीं, त्या ठिकाणचे नकाशेच नसतात. नकाशावर जमिनींचा भू-भाग दाखविलेला आहे असे नकाशे असणें हे केव्हांही फायद्याचे आहे. ब्रिटनमध्यें असे सर्व माहिती दिलेले नकाशे आहेत. ज्या ठिकाणीं नकाशाचें स्केल एक इंचास एक मैल असें असतें अशा नकाशावर माहिती भरणें फार कठीण होतें व त्याकरतां हें काम फारच काळजीपूर्वक व्हावें लागतें. याकरितां असे नकाशे हातानें लिहून मोठे करावे लागतात. कारण, अगदीं लहान स्केलवर असलेल्या नकाशावर शेताच्या मर्यादा फारच लहान दाखविण्यांत आल्यामुळें अशा नकाशावर माहिती भरण्याचें काम बिनचूक होऊं शकत नाहीं.

**हवाई विमानांतून फोटो घेणें:**—हें पहाणीचें काम विमानांतून फोटोग्राफर घेऊन करणें बरेंच शक्य आहे. असे फोटोग्राफ्स घेतल्यानंतर या कामांत तरबेज झालेले लोक या फोटोग्राफ्सवरील माहितीचा उपयोग करून जरूर ते नकाशे तयार करूं शकतात.

आफ्रिकेंतील न्यॅसालंडचे वरील प्रकारचे हवाई फोटोग्राफ्सवरून लंडन येथें फारच सुंदर व बिनचूक असे नकाशे तयार केलेले आहेत. तथापि प्रत्यक्ष जमिनीवर हिंडून हे नकाशे ताडून पहाण्याची जरूरी असते व याकरितां हवेंतून फोटोग्राफ्स घेतले तरी सुद्धां जमिनीवरून प्रत्यक्ष पहाणी करणें अवश्य आहे.

अशा प्रकारचे समग्र भूमिभागाचे नकाशे तयार केल्यानंतर त्यावरून आपणास ज्या जमिनींचा उपयोग झालेला नाहीं अशा प्रामुख्यानें समजून येतील व यावरून अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढें येतो तो हा कीं, कांहीं जमिनी पूर्ण लागवडीखालीं आहेत व कांहीं नाहींत याचें कारण काय? यावरून कांहीं जमिनींचा कांहीं पिकाकरितां उपयोग व कांहीं पडीत असे कां असावें या संबंधीं पूर्ण माहिती देणारीं भरपूर टिपणें या पहाणीपासून तयार होतात व हा एक या पहाणीचा भागच होतो.

**प्राथमिक पहाणी:**— कोणत्याही देशास आपल्या देशांतील भूमीभागाचा उपयोग करण्याची योजना आंखण्यापूर्वी वरील प्रकारची पहाणी होण्याची आवश्यकता आहे. कारण, प्रत्यक्ष सध्यां परिस्थिति काय आहे व त्याचीं कारणें काय हें समजणें आवश्यक. याकरितां ज्या जमीन उपयोगाच्या योजनाबद्दल आपण बोलतो त्यासंबंधीं प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे याची पहाणी अगोदर आपल्या पुढें असली पाहिजे.

वर निर्दिष्ट केलेल्या कमिशनच्या शिफारशीमुळें युरोप व अमेरिका यांतील देशांमध्यें कांहीं कार्यकर्त्यांनीं अशी पहाणी करण्याचें काम हातीं घेतलें आहे. या पहाणीस "पायलट सर्वे" 'प्राथमिक पहाणी' असें म्हटलें जातें व हें काम जगांतील निरनिराळ्या भागांत व्यवस्थितपणें सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

युरोपांतील देशांच्या या पहाणीच्या कामाच्या मुख्य ऑफिसकरितां लंडन येथील जिऑग्राफिकल सोसायटीनें आपल्या इमारतीमध्यें जागा दिलेली आहे. स्वतः प्रो. डडले स्टँप हे डायरेक्टर या नात्यानें व मि. जॉन कॅलौ हे ऑर्गनायझिंग सेक्रेटरी या नात्यानें उभयतां, युरोपांतील निरनिराळ्या देशांशीं पत्रव्यवहार करून त्यांनीं आपआपल्या देशांत भूमीभागाची पहाणी सुरू करण्याकरितां मार्गदर्शन करीत आहेत.

## नफा कमी झाला, म्हणून कामगारांना काढतां येणार नाहीं

नफा कमी झाला म्हणून कामगारांना काढतां येणार नाहीं, असा निवाडा लेबर अपेलेट ट्रायब्युनल ऑफ इंडियानें नुकताच दिला आहे. कानपूरची जे. के. आयर्न अँड स्टील कंपनी आणि आयर्न अँड स्टील मजदूर यूनियन ह्यांचेमधील तंट्याचे बाबतींत हा निवाडा झाला. जे. के. आयर्न अँड स्टील कंपनीनें एप्रिल, १९५१ मध्यें १५० कामगारांना कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें व हूप मिल्स कलकत्त्याला नेल्यामुळें, कमी केलें होतें. हीं कपात बेकायदा असल्याचें कामगारांचें म्हणणें होतें. ॲडज्युडिकेटरनें, " कामगारांना कारखान्यांत कामावर तात्काळ घ्यावें, त्यांच्या नोकरींत खंड पडला असें मानूं नये आणि आळीपाळीनें कामगार कमी करावे, " असा हुकूम केला होता. कामगारांना काढण्यांत मालकाची दुर्बुद्धि नव्हती, म्हणून ॲडज्युडिकेटरनें नुकसान भरपाई देवविली नव्हती. युनियन व मालक ह्या दोघांनींहि अपील केलं, त्याचा निकाल वरीलप्रमाणें झाला.

## व्याजाचा दर ठरविण्याचा कोर्टाचा अधिकार

दावा लावल्यापासूनच्या तारखेपुढील व्याजाचा दर ठरविण्याचा कोर्टास अधिकार आहे, असें हायकोर्टानें जाहीर केलें आहे. दोन गहाणखतांचे आधारावर श्री. पी. एल. मोडक ह्यांनीं कर्ज दिलें होतें. पुण्याचे सिव्हिल जज्ज ( सीनिअर डिव्हिजन ) ह्यांनीं डिक्री देतांना मुद्दलावर, तें फिटेपर्यंत, ४% व्याजाचा हुकूम दिला. गहाणखतांत ९% व्याज ठरलेलें होतें. श्री. मोडकांनीं हायकोर्टाकडे अपील केलें, तेव्हां त्याचा निकाल वरीलप्रमाणें लागला.

## टाटा कंपनीचें नवें डिव्हिडंड

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें ३१ मार्च, १९५२ अखेरच्या वर्षाचें डिव्हिडंड जाहीर झालें आहे. डिफर्ड शेअर्सवर ११५ रु. ३ आ. व ऑर्डिनरी शेअर्सवर २१ रु. डिव्हिडंड मिळणार आहे. गेल्या वर्षीचें डिव्हिडंड अनुक्रमें ९३ रु. १० आ. ६ पै व १८ रु. होतें.

टाटा स्टील डिव्हिडंडचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे.

**डिव्हिडंडमधील चढउतार**

| वर्ष | प्रत्येक शेअरवर डिव्हिडंड (रु.) ऑर्डिनरी | डिफर्ड |
|---|---|---|
| १९३४–३५ | नाहीं | नाहीं |
| १९३५–३६ | ६ | ७–८–० |
| १९३६–३७ | १० | ३६–३–६ |
| १९३७–३८ | १५–८ | ७५–११–३ |
| १९३८–३९ | १८ | ९३–१०–५ |
| १९३९–४० | २५ | १४३–१४–७ |
| १९४०–४१ | २९ | १७२–१०–० |
| १९४१–४२ | २७ | १५८–४–४ |
| १९४२–४३ | २३ | १२९–८–९ |
| १९४३–४४ | २३ | १२९–८–९ |
| १९४४–४५ | २३ | १२९–८–९ |
| १९४५–४६ | २३ | १२९–८–९ |
| १९४६–४७ | १९ | १००–१३–४ |
| १९४७–४८ | १४ | ६४–१५–० |
| १९४८–४९ | १४ | ६४–१५–० |
| १९४९–५० | १६ | ७९–५–० |
| १९५०–५१ | १८ | ९३–१०–६ |
| १९५१–५२ | २१ | ११५–३–० |

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

३० जून, १९५२ अखेर संपलेल्या वर्षी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला ( गेल्या वर्षातील राहिलेला १७,६५,६३८ रु. १० आ. ७ पै शिलकी नफा धरून ) ६५,४९,९९९ रु. ५ आ. ६ पै नफा झाला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे:—

| | रु. आ. पै |
|---|---|
| ३० जून १९५२ अखेरच्या सहामाही साठी करमाफ १२% ( प्रत्येक भागास १ रु. ८ आ ) अँड इंटेरिम डिव्हिडंड | १८,८७,२५५–०–० |
| पुढील सहामाहींत ओढण्याची रक्कम ( कराची तरतूद न करता ) | ४६,६२,७४४–५–६ |
| | ६५,४९,९९९–५–६ |

## "सहकारी जगत्" चा ताजा अंक

"सहकारी जगत्" द्वैमासिकाचा मे–जून १९५२ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत मलायांतील सहकारी चळवळ, युगोस्लाव्हियांतील शेतकी–मजूर सहकारी संस्था, सहकारी प्रवासी संघटना, नव–चीनमधील सहकार, मुंबई इलाख्यांत मार्केट अॅक्टची जरूरी आहे काय?, शेतकी पतपुरवठा योजनेंतील रिझर्व्ह बँकेचें कार्य, इत्यादि माहितीपूर्ण लेख आले असून संपादकीय, ग्रंथपरीक्षण, सहकारी समाचार, इत्यादि नेहेमींचीं सदरेंहि त्यांत आहेत.

## हिंदी लष्करांत पंजाबी, उत्तर–प्रदेशी व मद्रासी ह्यांचा भरणा

हिंदी लष्करांतील सैनिकांची ३१ डिसेंबर, १९५१ रोजींची राज्यवार टक्केवारी खालील प्रमाणें होती.

| राज्य | % | राज्य | % |
|---|---|---|---|
| पंजाब | २६·७ | उत्तर प्रदेश | १६·२ |
| मद्रास | १४·३ | आसाम | १·३ |
| बिहार | ३·१ | मुंबई | ५·२ |
| मध्य प्रदेश | १·५ | ओरिसा | ०·५ |
| प बंगाल | १·९ | हैद्राबाद | ०·५ |
| जम्मू काश्मीर | १·७ | मध्य भारत | ०·७ |
| म्हैसूर | १·० | पेप्सु | ४·६ |
| राजस्थान | ५·३ | सौराष्ट्र | ०·२ |
| त्रावणकोर-कोचीन | ४·६ | अजमीर | ०·२ |
| बिलासपूर | ०·२ | कुर्ग | ०·३ |
| दिल्ली | ०·७ | मणिपूर | ०·२ |
| विंध्य प्रदेश | २·० | नेपाळ, सिक्किम, इतर | ८·२ |

## हिंदी लष्करांत स्वदेशीची मोहीम

हिंदी लष्कराच्या "स्वदेशी" च्या प्रचारामुळें लष्करी अधिकारी व जवान हे कॅन्टीन्समधून अधिकाधिक स्वदेशी माल खरेदूं लागले आहेत. ह्या कॅन्टीन्समध्यें दरसाल कोट्यावधि रुपयांची विक्री होत असते. ह्या विक्रीपैकीं ५६·९% विक्री १९४८ मध्यें विदेशी मालाची होती. १९५१ मध्यें हें प्रमाण १७·५% वर उतरलें.

## डॉ. डे ह्यांची नवी नेमणूक

हिंदी टॅरिफ बोर्डाचे गेल्या मार्चमध्यें निवृत्त झालेले अध्यक्ष डॉ. एच्. एल्. डे ह्यांची इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या मॅनेजिंग डायरेक्टरांचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली आहे. आशियांत फंडाचा कारभार वाढत आहे त्यासंबंधांतील ही नेमणूक आहे.

## हिंद–पाकिस्तान व्यापारांत पाकिस्तानला अनुकूल तफावत

२६ फेब्रुवारी, १९५१ रोजीं भारत–पाकिस्तानें व्यापारी करार झाला, तेव्हांपासून ३१ मे, १९५२ अखेरच्या मुदतींत भारतानें पाकिस्तानाकडून ११६ कोटी रुपयांचा माल आयात केला व पाकिस्ताननें ५६ कोटी रुपयांचा हिंदी माल घेतला. हा करार ३० जून रोजीं संपुष्टांत आला. परंतु ७ ऑगस्टपर्यंत तो वाढविण्यांत आला आहे आणि नवीन करारासंबंधीं वाटाघाटी बुधवार ता. २३ रोजीं दिल्ली येथें सुरू होणार आहेत.

## मुंबई सरकारचें इंपीरियल बँकेंत कॅशक्रेडिट खातें

मुंबई सरकारनें इंपीरियल बँकेमध्यें ४ कोटी रुपयांचें कॅशक्रेडिट खातें उघडलें आहे. आयात धान्यासाठी पैसे देण्यास सरकारी खात्यांत पुरेशी रक्कम मार्च, १९५२ मध्यें नव्हती. म्हणून, इंपीरियल बँकेकडून २ कोटी रुपये घेतले ते मेमध्यें फेडण्यांत आले. चालू वर्षांत आणखी २ कोटी रुपये असेच घ्यावे लागण्याचा संभव आहे, त्याची तरतूद करण्यांत आली आहे.

## बँकांच्या लिक्विडेशनचें काम लवकर संपविण्यासाठी तरतुदी

बँकिंग कंपन्यांच्या लिक्विडेशनचें काम सोपें करून लवकर संपवितां यावें, ह्या दृष्टीनें तरतुदी सुचविण्यासाठी भारत सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमली आहे. सध्यांच्या कायद्याप्रमाणें, लिक्विडेशनचें काम फार दिरंगाईचें होतें. १९४९ मध्यें भारत सरकारनें त्यांत सुधारणा केल्या, त्या अपुऱ्या ठरल्या आहेत. अरेंजमेंटच्या स्कीमखाली चालणाऱ्या बँकांच्या परिस्थितीचाहि कमिटी विचार करणार आहे.

## सहकारी बँकांपुढील निकडीचे प्रश्न

**श्री. खोले ह्यांचें भाषण**

पुणें सें. को. बँकेच्या जुन्नर शाखेच्या नारायणगांव उपशाखेचें उद्घाटन सहकार खात्याचे उपमंत्री श्री. बी. डी. देशमुख ह्यांचे हस्तें झालें. त्यावेळीं बँकेचे चेअरमन, श्री. य. द. खोले, ह्यांनीं प्रास्ताविक भाषणांत सहकारी संस्थांपुढील प्रश्नांचें मार्मिक दिग्दर्शन केलें. त्यांच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग येथें दिला आहे:—

"आपल्या प्रांतांत आतां नवीन शेती अर्थव्यवस्था सुरू झाली असून पूर्वीच्या अपेक्षेपेक्षांही सहकारी सोसायट्यांच्या सभासदांच्या गरजा वाढल्यामुळें अनेक अडचणी रोज सहकारी कार्यकर्त्यांच्या पुढें येत आहेत. कर्जास अंतीम जरी जमीन तारण असली तरी ती चालू शेतीच्या कर्जाचा विचार करतां पूर्वीप्रमाणें मूलभूत अशी धरावयाची नाहीं. आणि या दृष्टीनें कर्जवाटणीही पिकाचे हंगामावर द्यावयाची असून वसूलही पिकाचे हंगामावर यावयास पाहिजे. पूर्वीचे धोरणानुसार कर्जमंजुरीचा तक्ता पाहून वसूल घ्यावयाचा व नवीन कर्ज द्यावयाचें अशी जुनी पद्धति चालू ठेवल्यास नवीन योजना केव्हां कोलमडून पडेल हें सांगणें कठीण आहे. आणि या दृष्टीनें कर्ज मंजूर करतांना तें आर्थिक दृष्ट्या परत फेडीस समर्थनीय आहे किंवा नाहीं यासंबंधीं विचार अवश्य करावयास पाहिजे. नवीन कर्जपद्धतीचा एक भाग म्हणजे योग्य वेळीं उत्पादनासाठीं व माफक व्याजानें कर्ज द्यावयाचें हा आहे. पण त्यास पूरक म्हणून सहकारी सोसायट्यांच्या सभासदांची उत्पादनशक्ति वाढविणें, अधुनिक शेतीसाधनांचा पुरेपूर उपयोग करणें व शेतीमालाची विक्री सहकारी संस्थांचे मार्फत होऊन त्यामधून कर्जफेड करणें हा एक आवश्यक भाग आहे.

"शेती-मालाच्या किमान किंमती किंवा नियंत्रणासंबंधीचें धोरण खंबीर असल्याशिवाय सहकारी चळवळीनें कितीही काळजीपूर्वक कार्य केलें तरी त्यांत अडचणी आल्याशिवाय रहाणार नाहींत. यासंबंधीं एकदोन गोष्टींचा जरी जातां जातां उल्लेख केला तरी तो पुरेसा आहे असें वाटतें. कापड व सूत यांचे किंमतीबाबत व वाटपासंबंधीं नियंत्रण करण्यांत येऊन हें काम सहकारी संस्थांमार्फत करण्यांत यावें असा आग्रह धरण्यांत आला व नियंत्रणानंतरची सर्व आर्थिक जबाबदारी सहकारी संस्थांवर टाकण्यांत आली. नुकत्याच आलेल्या आर्थिक मंदीच्या लाटेंत नियंत्रण न उठतां कापड व सूतवांटप करणाऱ्या सहकारी संस्थांची शोचनीय अशी स्थिति झाली आहे व अंगिकृत केलेले व्यवहार सुलभ रीतीनें व धडपणें कसे सुटतील यासंबंधीची काळजी चालकांना करावी लागत आहे. सहकारी संस्थांनीं कोणताही व्यवहार तेजीमंदीच्या तत्त्वावर करणें श्रेयस्कर अगर हितावह नाहीं. आणि म्हणून असें आग्रहानें प्रतिपादन करावें लागत आहे कीं, भांडवलाची सुरक्षितता व माफक नफा यावरच हा व्यवहार सरकारनें सहकारी संस्थांच्यावर सोपवावा. दुसरें उदाहरण म्हणजे गुळाच्या अचानक उतरलेल्या किंमती. कर्जफेडीची ऐपत ठरविण्यास शेतीमालाची किमान किंमत ठरविणें हें आवश्यक असल्याचें अनेक वेळां सहकारी कार्यकर्त्यांनीं प्रतिपादन केलें आहेच. परंतु त्यावेळची सहकारी संस्थावरील जबाबदारी मर्यादित होती म्हणून जरी हा प्रश्न गौण मानला गेला असला तरी नवीन अर्थव्यवस्थेंत याबाबत महत्त्वाचें स्थान असणें फार अगत्याचें आहे. व तसें तें न दिलें गेल्यास पुढील परिस्थिति भयावह राहील हें सांगणें मला या ठिकाणीं इष्ट वाटत आहे."


# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

### मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालु असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५१।१६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.